॥ तुझ्या कांतिसम रक्तपताका ॥

गायिकाः सुमन कल्याणपूर
गीतः ग. दि. माडगूळकर
संगीतः स्नेहल भाटकर
चित्रपटः अन्न आणि अन्न

तुझ्या कांतिसम रक्तपताका पूर्व दिशे फडकते
अरुण उगवला प्रभातकाले उठ महागणपते ॥ धृ. ॥

सूर्याआधी दर्शन घ्यावे तुझे मूषकध्वजा
शुभद सुमंगल सर्वांआधी तुझी पाद्यपूजा
छेडुनी वीणा जागविते तुज सरस्वती भगवती ॥ १ ॥

आवडती तुज म्हणूनी आणिली रक्तवर्ण कमळे
पाचू मण्याच्या किरणासम ही हिरवी दूर्वादळे
उभ्या ठाकल्या चौदा विद्या घेउनिया आरती ॥ २ ॥

शूर्पकर्णका उठ गजमुखा उठी रे मोरेश्वरा
तिन्ही जगाचा तूच नियंता विश्वा असे आसरा
तुझ्या दर्शना अधीर देवा हरब्रह्माश्रीपती ॥ ३ ॥